SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI'S
Reg.No. F2301/Gad./Mah.

# Gramgeeta Mahavidyalaya

**Arts, Commerce & Science** (Granted)
**Chimur,** Dist. Chandrapur (M.S.) - 442903
Email : gmcchimur@gmail.com | Web.: www.gmcchimur.org

Principal
**Dr. Amir A. Dhamani**
M.Sc.Ph.D.

**Ph.No.** (07170) 203870, 203879
**Mob.** 9422128453, 9834230982

**Ref.No.:** GMC/1612/2019 **Date :** 23/02/2019

प्रती,

मा.कार्यक्रम समन्वयक,
राष्टीय सेवा योजना विभाग.
गोंडवाना विद्यापिठ, गडचिरोली.

विषय:-रासेयो वार्षीक अहवाल पाठवित असल्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की,ग्रामगीता महाविद्यालय चिमुर.ता.चिमुर जि.चंद्रपुर येथील राष्टीय सेवा योजना विभागाचे सत्र २०१८-१९ चा रासेयो वार्षीक अहवाल आपणाकडे पाठवित आहोत.

कृपया आपण तो स्वीकाराल. हि विंनती.

दिंनाक-

प्राचार्य
Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

सहपत्रे:-१) रासेयो नियमित व शिबीर अहवाल
२) आवश्यक फोटो
३) बातम्याची कात्रणे

28/02/19
लिपीक
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर
## राष्ट्रीय सेवा योजना
## वार्षिक अहवाल
## सत्र : २०१८-२०१९

### सामान्य माहीती

**१) महाविद्यालयाचे नाव** :– ग्रामगीता महाविद्यालय (कला,वाणिज्य व विज्ञान) चिमूर

**२) संपुर्ण पत्ता** :– मु.पो. चिमूर ता. चिमूर जि. चंद्रपूर

**३) प्राचार्यांचे नाव** :– डॉ. अमीर ए. धमानी

दुरध्वनी क्र. :– ०७१७०–२०३८७९

भ्रमणध्वनी क्र. :– ९४२२१२८४५३ ई मेल :– gmcchimur@gmail.com

| **४) कार्यक्रम अधिकाऱ्याचे नाव** | भ्रमणध्वनी क्र. |
|---|---|
| १) प्रा. अरुण विनायक पिसे | ८८८८०१५१६१ |

### ५) रासेयो सल्लागार समीती

| | | |
|---|---|---|
| १) डॉ. अमीर ए. धमानी | प्राचार्य | अध्यक्ष |
| २) श्री. चिवंडे साहेब | वनपरिक्षेत्र अधिकारी | सदस्य |
| ३) श्री. संजय नागतिलक | तहसिलदार | सदस्य |
| ४) श्री. मुदखेडे साहेब | BDO चिमूर | सदस्य |
| ५) डॉ. दिगांबर मेश्राम | आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ६) प्रा.सौ.वरदा खटी | महीला शिक्षक | सदस्या |
| ७) प्रा. हुमेश्वर आनंदे | सहा. शिक्षक | सदस्य |
| ८) प्रा. अरुण पिसे | कार्यक्रम अधिकारी | सचिव |
| ९) प्रा.डॉ. संदीप सातव | सहा. कार्यक्रम अधिकारी | सदस्य |
| १०) सुरज सोपान देशकर | विद्यार्थी प्रतिनीधी | सदस्य |
| ११) कु. प्रतिक्षा दिपक कुमरे | विद्यार्थीनी प्रतिनीधी | सदस्य |
| १२) श्री. विनोद चाफले | सरपंच उसेगांव | सदस्य |
| १३) श्री. संजय ठाकरे | ग्रामसेवक उसेगांव | सदस्य |

सल्लागार समीतीच्या बैठका दिनांक ०४/०८/२०१८ व १८/०२/२०१९

**६) रासेयो पथकांची संख्या** : पथक – २

विद्यार्थी संख्या : विद्यार्थी – १००

**७) महाविद्यालयीन विद्यार्थी संख्या –**

| अ.जा. | | अ.जमाती | | वि.भ.ज. | | इ.मा.व. | | वि.मा.व. | | खुले | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री |
| ६१ | ६७ | ७६ | ८५ | १८ | १९ | ८९ | १०६ | ७ | ५ | ९ | १२ | २६० | २९४ |

**८) रासेयो नोंदणी झालेल्या विद्यार्थी संख्या :– १००**

**९) विद्यार्थ्यांकरीता आयोजीत प्रबोधन वर्ग –**

विद्यार्थी प्रबोधन वर्ग, चर्चा सत्र, मार्गदर्शन

**१०) रासेयो पथकाने दत्तक घेतलेले गाव**

उसेगांव – लोकसंख्या – ११४०

महाविद्यालयापासुन अंतर – १५ किलोमीटर

**११) नियमीत रासेयो कार्यक्रम**

१) स्वच्छता कार्यक्रम

महाविद्यालयीन परिसर स्वच्छ करणे.

२) शांतता पथकाची स्थापना

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात हिंसक प्रवृत्ती वाढु नये व शांतता पुर्ण सहजिवनाचे महत्व विद्यार्थ्यांना कळावे म्हणुन शांतता पथकाची स्थापना करण्यात आली.

३) सुरक्षा पथकाची स्थापना

सहजीवन सुरक्षेच्या दृष्टीने २० विद्यार्थ्यांचे सुरक्षा पथक स्थापन करण्यात आले.

४) पर्यावरण संवर्धन

पर्यावरण समीती चिमूर मध्ये एकुण ५० विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली.

५) व्यसनमुक्ती पथक

विद्यार्थ्यांना व्यसनापासून मुक्त करण्याच्या दृष्टीने एकुण २० विद्यार्थ्यांचे व्यसनमुक्ती पथक स्थापन करण्यात आले.

## विविध नियमीत उपक्रम खालीलप्रमाणे

१) वृक्षरोपण कार्यक्रम

दिनांक ०६ ऑगष्ट रोजी महाविद्यालयात एकुण ४५ झाडे लावण्यात आली.

२) क्रांतीदिन

दिनांक ०८ ऑगष्ट रोजी महाविद्यालयात क्रांतीदिन साजरा करण्यात आला. व हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

३) <u>स्वच्छता रॅली</u>

दिनांक १४ ऑगष्ट रोजी प्रधानमंत्री स्वच्छता अभियान कार्यक्रमाअंतर्गत चिमूर मध्ये स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले. घोषवाक्ये, पथनाटय, नाटीका चे माध्यमातून गावकऱ्यांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात आले

स्वातंत्र्य दिन साजरा करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयीन परिसर स्वच्छ करण्यात आला.

**स्वातंत्र्य दिन**

दिनांक १५ ऑगष्ट २०१८ रोजी महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. तोरणे पताका लावून व रांगोळया काढुन परिसर सजविण्यात आला.

मा. प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांनी ध्वजारोहण केले कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## <u>***सामाजिक समरसता पंधरवाडा***</u>

सद्भावना पंधरवाडा निमित्ताने महाविद्यालयात अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

- दिनांक ०३/०९/२०१८ सोमवारला रांगोळी स्पर्धा आयोजीत करण्यात आली. स्पर्धेत एकुण १४ विद्यार्थी सहभागी झालेत. परिक्षणाअंती **कु. उज्वला गोपीचंद भानारकर (बि.कॉम –भाग १)** हिला प्रथम बक्षीस व **कु. अनिता रतीराम जांभुळे (बि.ए. – भाग २)** हिला द्वितीय बक्षीस देण्यात आले.

- दिनांक ०४/०१/२०१८ मंगळवारला पोस्टर स्पर्धा आयोजीत करण्यात आली. एकुण ०९ विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झालेत. परिक्षणाअंती **कु. प्रतिक्षा दिपक कुमरे (बि.एस.सी.–भाग २)** हिला प्रथम क्रमांक देण्यात आला. व **कु. राजश्री बंडू सहारे (बि.एस.सी.–भाग २)** हिला द्वितीय क्रमांक देण्यात आला.

- दिनांक ०४/०९/२०१८ मंगळवारला क्ले मॉडेलींग स्पर्धा आयोजीत करण्यात आली. या स्पर्धेत एकमेव विद्यार्थीनी **कु. श्रृतीका धनराज खाडे (बि.एस.सी.–भाग १)** हिला प्रथम क्रमांक देण्यात आला.

- दिनांक ०४/०९/२०१८ मंगळवारला वादविवाद स्पर्धा आयोजीत करण्यात आली. 'सेमीस्टर पद्धती योग्य की अयोग्य' हा विषय ठेवण्यात आला होता. स्पर्धेत एकुण ०७ विद्यार्थी सहभागी झालेत. परिक्षणाअंती **कु. भाग्यश्री पसारे ( बि.एस.सी.–भाग २)** हिला प्रथम क्रमांक व **अकिब आरिफ शेख ( बि.एस.सी.–भाग २)** याला द्वितीय क्रमांक देण्यात आला.

- दिनांक ०३/०९/२०१८ सोमवारला कार्टुन स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत एकुण १३ स्पर्धकांनी भाग घेतला. परिक्षणाअंती **कु. अंशिका लबडे (बि.एस.सी – भाग ३)** हिला प्रथम व **कु. श्रृतीका श्रीराम खाडे (बि.एस.सी. – भाग १)** हिला द्वितीय बक्षीस देण्यात आले.

- दिनांक ०५/०९/२०१८ रोजी सद्भावना पंधरवाडा समारोपीय कार्यक्रम शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. या शिक्षकदिनाच्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. धमानी सर, प्रमुख अतिथी म्हणून प्रा. अशोक कष्टी सर (महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालय, भिसी) व डॉ. सातव सर उपस्थित होते.

  कार्यक्रम प्रास्तावीक प्रा. अरुण पिसे यांनी केले. संचालन सुरज देशकर यांनी केले. आभार प्रदर्शन अमीत प्रकाश खोब्रागडे यांनी केले. अशाप्रकारे शिक्षकदिन साजरा करुन सद्भावना पंधरवाडा साजरा करण्यात आला.

- दिनांक २१ सप्टेंबर २०१८ रोजी सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे एस.आर.डी, एन.आर.डी परेडकरीता **१) आशीष दिवाकर ढोणे (बि.ए.–भाग २) व २) आकीब आरीफ शेख (बि.एस.सी. –भाग २)** यांना पाठविण्यात आले.

- २४ सप्टेंबर २०१८ रासेयो स्थापना दिन साजरा करण्यात आला.

- विद्यापीठ स्तरीय आंतर महाविद्यालयीन सांस्कृतीक स्पर्धा राष्ट्रपीता महात्मा गांधी महाविद्यालय, सावली येथे आयोजीत करण्यात आली. या स्पर्धेकरीता अनेक विद्यार्थी पाठविण्यात आले. प्रहसन, मुखनाट्य, नकला, एकांकिका, वर्क्तृत्व, रांगोळी, फोटोग्राफी, कार्टुन पेन्टीग, पोष्टर मेकींग, कोलार्ज, प्रश्नमंजूषा अशा अनेक स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळविलेत.

- २ आक्टोंबर २०१८ रोजी गांधी जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला.

- दिनांक २६ नोव्हेंबर २०१८ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला.

- दिनांक ०३ जानेवारी २०१९ सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला.

- ०६ डिसेंबर २०१८ रोजी महापरिनिर्वाह दिन साजरा करण्यात आला.

- इंद्रधनुष्य स्पर्धा २०१८ राज्यस्तरीय सांस्कृतीक युवा महोत्सव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे दिनांक ०७ ते ११ डिसेंबर २०१८ रोजी स्पर्धेत

  | | |
  |---|---|
  | १) सुभाष मंगल नन्नावरे | बि.ए. भाग १ |
  | २) कु. प्रियंका अरुण मुरकूटे | बि.एस.सी. भाग १ |

  वरील विद्यार्थी सहभागी होते.

- दिनांक ०६ डिसेंबर ते १२ डिसेंबर २०१८ रोजी हटिया, रांची, झारखंड येथे आयोजीत राष्ट्रीय रासेयो शिबीरात सुरज सोपान देशकर (बि.कॉम.–भाग २) सहभागी होते.

- दिनांक ०८ जानेवारी ते १२ जानेवारी २०१९ रोजी राज्यस्तरीय रासेयो शिबीरात ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव आयोजीत रत्नापूर येथे ०४ विद्यार्थी सहभागी होते.

- दिनांक २५ जानेवारी ते २९ जानेवारी २०१९ चे सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे आयोजीत उत्कर्ष स्पर्धा चाचणी परीक्षा शिबीरात एकुण ०५ विद्यार्थी सहभागी झालेत.
- दिनांक २६ जानेवारी २०१९ प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.
- दिनांक २७ जानेवारी ते ३० जानेवारी २०१९ चे रा.तु.म. विद्यापीठ येथे आयोजीत उत्कर्ष २०१९ मध्ये सुभाष मंगल नन्नावरे विद्यार्थी सहभागी झाला.
- दिनांक २८ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०१९ चे संताजी जगनाडे महाविद्यालय, नागपूर (हिंगना) यांनी आयोजीत कलेले आमगांव देवळी ता. हिंगना येथील राज्यस्तरीय रासेयो शिबीरात ०२ विद्यार्थी सहभागी झालेत.
- दिनांक ०६ फेब्रुवारी २०१९ रोजी मतदारांमध्ये जनजागृती घडवून आणण्यासाठी मतदान रॅलीचे आयोजन करण्यात आले.

वरीलप्रमाणे महाविद्यालयात अनेक प्रकारे कार्यक्रम आयोजीत करण्यात आले. व विद्यार्थी अनेक स्पर्धांमध्ये सहभागी होऊन त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणुन रासेयो विभागामार्फत प्रयत्न करण्यात आलेत.

## ***विशेष शिबीर कार्यक्रम***

ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर येथील रासेयो विभागाअंतर्गत विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले.

अ) शिबीर स्थळ — मौजा उसेगांव (नेरी)

ब) कालावधी — १५ जानेवारी ते २० जानेवारी २०१९

| | पुरुष | स्त्री | एकुण |
|---|---|---|---|
| क) सहभागी विद्यार्थी : | ३० | २१ | ५१ |
| ड) सहाय्यक शिक्षक | ०१ | ०१ | ०२ |
| | | | ५३ |

शिबीरात राबविलेले कार्यक्रम व उपक्रमाबद्दल माहिती

## ***"निर्मल ग्रामासाठी युवाश्रमसंस्कार शिबीर"***

१५ जानेवारी ते २० जानेवारी २०१९ चे कालावधीत मौजा उसेगांव येथे रासेयो शिबीराचे आयोजन करण्यात आले.

**उद्‌धाटन समारंभ :**

सेमाना विद्या व वनविकास प्रशिक्षण मंडळ द्वारा संचालीत ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर व ग्रामपंचायत उसेगांव यांचे सयुक्त विद्यमाने आयोजीत **"निर्मल ग्रामासाठी युवासंस्कार"** शिबीराचे उद्‌धाटन सोहळा दिनांक १६ जानेवारी २०१९ बुधवारला सन्माणनीय अध्यक्ष प्राचार्य डॉ. अमीर धमानी व प्रमूख अतीथी डॉ राजेंद्र जाने (प्राचार्य) कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी, मा. विनोदजी चाफले सरपंच, उसेगांव यांचे उपस्थितीत पार पडला.

## शिबीर काळात पुर्ण करण्यात आलेले प्रकल्प

१) **स्मशान भुमी स्वच्छता :–** उसेगांव येथील स्मशान भुमीत इतस्तता झाले वाढली होती. ती तोडुन परिसर स्वच्छ करण्यात आला.

२) **रस्ता तयार करणे :–** शेतीकडे जाण्यासाठी गावकऱ्यांना अडचन जात होती. रस्त्यात माती टाकुन दुरुस्त करण्यात आला.

३) **परिसर स्वच्छता :–** गावातील रस्त्याच्या आजुबाजुला बाढलेली झुडपे तोडण्यात आली. व संपुर्ण गावातील रस्ते झाडुन साफ करण्यात आले.

४) **नाली निर्मीती :–** गावाच्या बाहेर सांडपाणी वाहुन जाण्यासाठी नालीनिर्मीती एकुण १०० मीटर करण्यात आली.

५) **नाल्यातील गाळ काढणे :–** पावसाळा नुकताच संपल्याने अनेक नाल्या गाळांनी तुंबल्या होत्या गाळा काढुन एकुण २०० मीटर नाल्या साफ करण्यात आल्या.

६) **बंधारे बांधने :–** गावालगतच उमा नदी वाहते नदीवर थैल्या भरुन पाणी अडविण्यात आले व गुरांसाठी तसेच शेतीसाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात आले.

७) **संडास निर्मीती :–** गाव तसे १०० टक्के हागनदारी मुक्त आहे त्यामुळे दोन ठिकाणी संडासचे खड्डे खोदुन चरसंडास निर्मीती करण्यात आली.

८) **सार्वजनिक संडास सफाई :–** गावाचे बाहर असणारे सार्वजनिक संडास घानीने अस्वच्छ झाले होते. ते सर्व साफ करण्यात आले.

९) **शोषखड्डे निर्मीती :–** विहीरीचे पाणी रस्त्यावर येत होते. अशा दोन विहीरीजवळ शाषखड्डे तयार करण्यात आले.

अशाप्रकारे अनेक ग्रामविकासाची कामे करण्यात आली.

## विद्यार्थी विकास कार्यक्रम

शिबीरार्थी स्वयंसेवक व गावातील विद्यार्थी यांच्या बौद्धीक व शारीरिक विकासाच्या दृष्टीने अनेक कार्यक्रम आयोजीत करण्यात आलेत.

१) सकाळी ५ वाजता उठुन विद्यार्थ्यांना बाहेर धावायला लावणे.

२) पतंजली योग समिती चिमूर द्वारा सकाळी व्यायाम व योगाचे विद्यार्थ्यांना धडे देण्यात आले.

३) विद्यार्थ्यांसाठी भजन स्पर्धा, गितगायन स्पर्धा, वर्क्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा अशा अनेक स्पर्धा घेण्यात आल्यात या स्पर्धामध्ये गावातील अनेक विद्यार्थी व महीला सहभागी झाल्या होत्या.

४) सामुदायीक ध्यान :– सायंकाळी ६.०० वा. शिबीरामध्ये सामुदायीक प्रार्थना घेण्यात आली. ग्रामस्त या प्रार्थनेला हजर होते.

५) सांस्कृतीक कार्यक्रम :– सायंकाळी ८.३० वा. गावकऱ्यांचे प्रबोधन व मनोरंजन करण्याचे उद्देशाने सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नाटीका, नकला, पथनाट्य, गितगायन द्वारा गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले. व पाणी वाचवा, वृक्षसंवर्धन, ग्रामस्वच्छता, पर्यावरण संवर्धन, शेतीविकास अशा अनेक विषयांवर जनजागृती घडवून आणली. प्रबोधनासोबत विद्यार्थ्यांचे सुप्त गुण येण्यास वाव मिळाला.

## बौद्धीक कार्यक्रम

दुपारच्या सत्रात बौद्धीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बौद्धीक कार्यक्रमासाठी अनेक विषय ठेवण्यात आले होते व कार्यक्रमाला मार्गदर्शन करण्यासाठी अनेक अतिथी उपस्थित होते.

दिनांक १७ जानेवारी २०१९ गुरुवारला 'ग्रामविकास युवकांची भुमीका' या विषयावर मार्गदर्शनासाठी मा. वनराज डांगे उसेगांव. प्रा. अशोक चरडे. नेहरु ज्युनिअर कॉलेज चिमूर अतिथी म्हणुन उपस्थित होते.

दिनांक १८ जानेवारी २०१९ शुक्रवारला 'महीला सबलीकरण काळाची गरज' या विषयावर मार्गदर्शनासाठी मा. सौ. अमीताताई पाटील, ग्रा.प.सदस्या उसेगांव, सौ. लताताई पिसे प.स. सदस्या चिमूर, सौ उषाताई सावसाकडे उसेगांव, प्रा. सौ. ज्योती पिसे, जनता महाविद्यालय नेरी, प्रा. वरदा खटी, प्रा. मंगला ठाकरे मुख्यधापक सौ. पंधरे मॅडम उपस्थित होत्या.

दिनांक १९ जानेवारी २०१९ शनिवारला 'ग्रामिण युवकांपुढील आव्हाने' या विषयावर मार्गदर्शनाकरीता प्रा. संजयजी पिटाळे, आदवले समाजकार्य महा. चिमूर. मा. मनोहर कामडी,
श्री भोलाजी पिसे, श्री [illegible], [illegible] आदि [illegible]

शेतकरी वाढोणा हे उपस्थित होते. तसेच 'मानव आणि वन्यजीव संघर्ष' यांवर गावकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मा. सौरभ दंदे, बॉम्बे नॅशनल हिस्ट्री सोसायटी नागपूर, मा. युवराज मुरस्कर, ट्री प्लॅंटेशन शंकरपूर हे उपस्थित होते.

# शिबीरकाळात आयोजीत केलेली शिबीरे

१) आरोग्य शिबीर :— मा. डॉ. दिगांबर मेश्राम, तालुका वैद्यकीय अधिकारी चिमूर, डॉ. ईश्वर मेश्राम व चमु प्राथमिक स्वास्थ क्रेंद्र नेरी, मा. डॉ. भगत सर व चमु ग्रामिण रुग्नालय चिमूर उपस्थित होते. गावातील एकुण ५२५ लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

२) पशुचिकीत्सा शिबीर :— मा. डॉ. देवराव जांभुळे, तालुका पशुवैधकीय अधिकारी चिमूर, डॉ. शिशुपाल मेश्राम पशुविकास अधिकारी, शंकरपूर, डॉ. येलमूले सहा. पशुचिकीत्सा अधिकारी नेरी उपस्थित होते. अंधत्व तपासणी, तोंडखुरी लसीकरण, खच्चीकरण अशाप्रकारे अनेक आजारांवर उपचार करण्यात आले. एकुण २३५ जनावरांचे उपचार केलेत.

३) रक्तदान शिबीर :— मा. गौसीया खान, आयुष रक्तपेढी नागपूर यांचे युनिटद्वारा रक्तदान घेण्यात आले एकुण २५ बॉटल रक्त गोळा करण्यात आले.

सायंकाळी ६.०० वाजता सामुदायिक प्राथनेचे महत्वावर मार्गदर्शन करण्याकरीता मा. सदाशिव नन्नावरे उसेगाव, मा. टिकारामजी वाघमारे पांढरवाणी, मा. विरदासजी दोडके उसेगांव, मा. भोयर सर विवेकानंद विद्यालय, खांबाळा उपस्थित होते.

४) रामधुन :— दिनांक १६ जानेवारी व २० जानेवारी रोजी सकाळी गावातुन रामधुन काढण्यात आली. सर्व विद्यार्थी वेशभुषा करुन रामधुनमध्ये सहभागी झालेत. त्याचप्रमाणे गावकरी सुध्दा सहभागी झालेत. टाळ, मृदंगाच्या गजरात लेझीमच्या तालावर गावकऱ्यांना रामधुनच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.

# *शिबीर समारोपीय कार्यक्रम*

दिनांक २० जानेवारी २०१९ रविवारला शिबीराचे समारोपीय कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ. अमीर धमानी, ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर मा. सतीश वारजुरकर, जि.प. सदस्य चंद्रपूर मा. गजाननभाऊ बुटके, जि.प. सदस्य चंद्रपूर मा. किशोरजी पिसे गटशिक्षण अधिकारी पं.स. चिमूर मा. विनोदजी चाफले, सरपंच उसेगांव अतिथी म्हणून उपस्थित होते.

सर्व अतिथींनी, गावकऱ्यांनी एकत्र येऊन गावाचा विकास करण्याचा प्रयत्न करावा. सरकारच्या ग्रामिण विकासासाठी अनेक योजना आहेत. ज्या गावात एकमेकांचे नियोजन केले जाते. त्या गावात अनेक योजना आणुन गावाचा विकास करता येतो असा विश्वास गावकऱ्यांना दिला.

कार्यक्रमाचे संचालन सुरज सोपान देशकर याने केले. अहवाल वाचन कु. प्रियंका अरुण मुरकुटे हिने केले, अनुभव कथन कु. अलिशा जालेंद्र सोरदे व अमीत प्रकाश खोब्रागडे यांनी केले. आभारप्रदर्शन कार्यक्रमाधिकारी प्रा. अरुण पिसे यांनी केले

कार्यक्रमाला सर्व गावकरी व महाविद्यालयाचे सर्व शिक्षकवृंद तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

सरतेशेवटी आपले शिबीर पुढच्या वर्षात आमच्या गावात अवश्य आणा असा आग्रह धरुन गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांना निरोप दिला.

# समारोप

उसेगांव आमच्या महाविद्यालयाच्या रासेयो विभागाने पाच वर्षासाठी दत्तक घेतलेले आहे. या गावात सुरवातीला फारसा विकास नव्हता. परंतु आज चार वर्षानंतर हया गावात संपुर्ण सिमेंटचे रस्ते आहेत, नाल्यांचे संपुर्ण बांधकाम झालेले आहे. रस्त्याचे दुतर्फा अनेक प्रकारची झाडे लावून त्यांना सरंक्षण कुंपण केलेले आहे. गावात जाण्याच्या मुख्य मार्गावर गेट तयार केलेला आहे. रस्त्याचे दुतर्फा घोषवाक्य लिहीण्यासाठी पाट्या लावलेल्या आहेत. सार्वजनिक संडास, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आधुनिक ग्रामपंचायत, सुशोभित उच्च प्राथमिक शाळा, घान कुठे पाहासला मिळत नाही. ८० टक्के साक्षरता, १०० टक्के संडास, गावाला लागुनच उमा नदी असल्यामुळे उपसा सिंचनामार्फत शेतीला सिंचन गटशेतीच्या माध्यमातुन तालुक्यात पहिला गटशेती प्रकल्प सुरु आहे. अशा विविध लक्षवेधी कार्यक्रमामुळे या गावाला तंटामुक्त गावपुरस्कार, हागनदारी मुक्त गावपुरस्कार, ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत तालुका स्तरीय प्रथम पुरस्कार व जिल्हा स्तरीय दुसरा पुरस्कार मिळालेला आहे. आणि राज्यस्तरावर आपल्या गावाला पुरस्कार मिळविण्यासाठी गावकरी व सरपंच प्रयत्नशिल आहेत.

या गावाची उत्तरोत्तर अशीच प्रगती होऊन एक निर्मल ग्राम म्हणुन प्रसिद्धी मिळावी अपेक्षा करुया व शुभेच्छा देऊया.

कार्यक्रमाधिकारी
कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना [illegible]
[illegible] महाविद्यालय

प्राचार्य
Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

# Gramgeeta Mahavidyalaya, Chimur
## Participate Students NSS Camp
## 2018 - 2019

| Sr.No. | Students Name | Class | Cast | Mob. No. | UID No. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Akshay Dnyaneshwar Zade | B.Com-III | OBC | 9370066987 | 3702 0373 7632 |
| 2 | Amit Devidas Rokade | B.Com-I | OBC | 7264969044 | 6734 4814 0364 |
| 3 | Suraj Ganesh Gajbhiye | B.Sc-I | SC | 9552926866 | 4798 6343 7227 |
| 4 | Ku. Pallavi Vilas Kamdi | B.Sc-I | OBC | 9049891052 | 9727 9230 8897 |
| 5 | Vishal Ramesh Shrirame | B.Sc-I | ST | 9208593654 | 9318 5005 8354 |
| 6 | Ku. Sayali Madan Poreddiwar | B.A.-I | OBC | 7719937015 | 2528 4972 6911 |
| 7 | Ku. Vaishali Gulab Dadmal | B.A.-I | ST | 7057687874 | 7330 6827 0564 |
| 8 | Ashish Motiram Nannaware | B.Sc-I | ST | 9767894691 | 6335 7742 8641 |
| 9 | Gurudev Ashok Ashtankar | B.Sc-I | OBC | 8805319958 | 6743 0311 2574 |
| 10 | Aniket Gajanan Kamdi | B.Sc-I | OBC | 8928268976 | 5188 4500 6637 |
| 11 | Dharmadas Tulshidas Dhakate | B.Sc-I | SBC | 7378625798 | 8229 5077 6413 |
| 12 | Swarup Ramesh Meshram | B.Sc-I | NT | 9172942884 | 2095 7658 6707 |
| 13 | Chetan Ishwar Chaware | B.Sc-I | OBC | 7264818970 | 5610 0872 6976 |
| 14 | Ku. Supriya Madhukar Dudhankar | B.A.-I | OBC | 9067320823 | 5894 4539 2409 |
| 15 | Ku. Mayuri Vinayak Bankar | B.A.-I | OBC | 9011401597 | 8056 5113 1543 |
| 16 | Ku. Nilima Prakash Nannaware | B.A.-I | ST | 8198231417 | 8575 9604 3279 |
| 17 | Sanket Vitthal Thawari | B.Sc-I | OBC | 9146242755 | 2544 3083 3776 |
| 18 | Mayur Shalikram Satikosare | B.A.-I | ST | 9673448827 | 9036 5026 0515 |
| 19 | Pravin Rajesh Jivtode | B.A.-I | ST | 7038582620 | 5263 1537 6800 |
| 20 | Satish Balaji Nannaware | B.Sc-I | ST | 7744067875 | 6112 5487 7072 |
| 21 | Ku. Priyanka Arun Murkute | B.Sc-I | OBC | 7066841468 | 9296 3546 6931 |
| 22 | Ku. Alisha Jalendra Sorade | B.Sc-I | SC | 7775884163 | 2476 9336 0389 |
| 23 | Ku. Sonu Govardhan Mundare | B.Sc-I | ST | 9370755375 | 4082 1703 6483 |
| 24 | Ku. Rani Diwakar Pise | B.Sc-I | OBC | 9552188917 | 9841 7112 8246 |
| 25 | Ku. Mrunali Diwakar Kundojwar | B.Sc-I | OBC | 9765174401 | 5151 2875 2404 |
| 26 | Vikki Uddhao Chaudhari | B.Com-II | ST | 9130435484 | 5473 0550 8454 |
| 27 | Roshan Prabhakar Rewatkar | B.Com-II | OBC | 7798473579 | 3339 0321 7972 |
| 28 | Ajit Suresh Zade | B.Sc-I | OBC | 7263814416 | 4698 5895 3376 |
| 29 | Ku. Achal Dhanraj Bahadure | B.Com-II | SC | 9637082679 | 6686 7442 2814 |
| 30 | Ku. Sneha Madan Dandekar | B.A.-I | OBC | 9067595358 | 3058 9645 9803 |
| 31 | Ku. Sakshi Vishwas Meshram | B.Sc-I | ST | 9158872560 | 5749 0255 3930 |
| 32 | Ku. Ashwini Purushottam Gudadhe | B.Sc-I | ST | 9921643419 | 2831 6484 6738 |
| 33 | Ku. Priyanka Ravindra Bankar | B.A.-I | OBC | 7083226395 | 5222 8201 3736 |
| 34 | Ku. Punam Rajkumar Meshram | B.Com-II | ST | 8605892415 | 8029 5701 3666 |
| 35 | Amar Mahadeo Sahare | B.Com-II | OBC | | 4957 7273 5215 |
| 36 | Ku. Vidya Dilip Kapate | B.Com-II | NT | 9146694837 | 2557 2439 4710 |
| 37 | Amit Prakash Khobragade | B.Com-II | SC | 9657838780 | 5064 1279 6966 |
| 38 | Suraj Sopan Deshkar | B.Com-II | OBC | 9850455361 | 4724 8767 2306 |
| 39 | Vikki Dilip Gaurkar | B.Com-II | SC | 9767717382 | 8541 6998 3958 |

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

| Sr.No. | Students Name | Class | Cast | Mob. No. | UID No. |
|---|---|---|---|---|---|
| 40 | Ku. Pratiksha Dipak Kumare | B.Sc-II | ST | 7066756472 | 3134 8123 6727 |
| 41 | Subham bandu Randive | B.Sc.-I | OBC | 8668974068 | |
| 42 | Atish Dnyaneshwar Soyam | B.Com.-I | ST | 9130595243 | |
| 43 | Ajit Pralhad Yelekar | B.Sc.-I | OBC | 9370079430 | |
| 44 | Gaurav Ishwar Khobragade | B.Sc.-I | SC | 7775057944 | |
| 45 | Akash Ravindra Gajbhe | B.A.-I | ST | 7038771644 | |
| 46 | Vaibhav Bhaurav Khiradkar | B.Sc.-I | OBC | 8766551621 | |
| 47 | Avinash Monohar Chaudhari | B.Sc.-I | OBC | 8669720361 | |
| 48 | Pankaj Rajkumar Patil | B.Com.-II | SC | 9890800698 | |
| 49 | Ku. Kajal Rambhau Soyam | B.A.-I | ST | 9011880560 | |
| 50 | Ku. Dimpal Vishwas Kulsange | B.Sc.-I | ST | 9021625376 | |
| 51 | Ku. Komal Harichandra Uike | B.A.-II | ST | 9373401566 | |

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur




शिबिरात स्वयंसेवक नालीतील गाळ काढतांना.





उसेगांव येथील रासेयो विशेष शिबिरात
प्राचार्य - डॉ. जानी सर मार्गदर्शन करतांना.

Principal
Gramgeeta Mahavidyalay
Chimur, Dist. Chandrapu



पतंजली योग समिती चिमूर द्वारा शिबीरात विद्यार्थ्यांना योगाचे धडे देतांना.



रासेयो शिबीरात विद्यार्थी रस्तासफाई करीत असतांना.

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन.

# ग्रामगीता महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**चिमूर** : राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून ग्रामगीता महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने द युनिक ॲकडमी, नागपूर यांच्या सौजन्याने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाचा कार्यक्रम नुकताच पार पडला.

कार्यक्रमादरम्यान राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. वरदा खटी तर मार्गदर्शक म्हणून द युनिक ॲकाडमी नागपूरचे बी. बी. गायकवाड, प्राचार्य धम्माणी आदी उपस्थित होते.

यावेळी गायकवाड म्हणाले, विद्यार्थ्यांनी युपीएससी व एमपीएससीचा अभ्यास काळजीपूर्वक करावा व स्पर्धा परीक्षेतील बारकावे समजून घ्यावे. ग्रामीण भागातही अन्सार शेख दडलेला आहे. तुम्हीही अधिकारी बनुन समाजात आदर्श मिळवू शकता, असेही त्यांनी सांगितले.

प्रा. खटी यांनी, विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्यता ठेवावी, आपल्या पालकांचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संदीप मेश्राम, संचालन शामल मेश्राम तर आभार करिश्मा सोनकुसरे यांनी मानले. यावेळी उपस्थित पाहुण्यांनी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे निरासरण केले.

यशस्वीतेसाठी प्रा. सातव, प्रा. आनंदे, प्रा. सोनटक्के, प्रा. बुटके, प्रा. शेंडे, मुकेश घटे, संजय खोब्रागडे, श्रीराम खाडे, मन्साराम घोडमारे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

पुण्य नगरी
शनिवार, ८ सप्टेंबर २०१८ । चंद्रपूर

# विद्यार्थ्यांना उत्तम संस्कार देऊन जबाबदार नागरिक घडवा : धम्मानी




## ग्रामगीता महाविद्यालयात सामाजिक समरसता पंधरवडा

**चिमूर** : शिक्षक हा भावीपीढीचा शिल्पकार असून, त्यांच्याकडूनच आपल्याला ज्ञान व जगाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी मिळत असते. प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूविषयी कृतज्ञता व्यक्त करावी. शिक्षकांना वैदिक काळापासूनच गुरूचे स्थान महान आहे. त्यांच्या ऋणातून आपण कधीच मुक्त होवू शकत नाही. शिक्षक हा समाज परिवर्तन करणारा घटक आहे. गुरूची महिमा जोपर्यंत सृष्टी आहे तोपर्यंत अशीच अबाधित राहणार असून, गुरूंनी विद्यार्थ्यांना उत्तम संस्कार देवून जबाबदार नागरिक घडवावे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. अमीर धम्मानी यांनी केले.

ग्रामगीता महाविद्यालयात आयोजित सामाजिक समरसता पंधरवडा समारोपीय कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालय भिसीचे प्रा. अशोक कष्टी, डॉ.संदीप सातव, प्रा. हुमेश्वर आनंदे उपस्थित होते. महाविद्यालयात १ ते ५ सप्टेंबर या कालावधीत सामाजिक समरसता पंधरवडा कार्यक्रमांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये पोस्टर स्पर्धेत प्रतीक्षा कुमरे, राजश्री सहारे, रांगोळी स्पर्धेत अनीता जांभुळे, शितल नेवारे, वादविवाद स्पर्धेत भाग्यश्री पसारे, आकीच शेख, कार्टून स्पर्धेत अंशिका लबडे, श्रुतीका खाडे, क्ले मॉडलिंग स्पर्धेत श्रुतीका खाडे यांनी प्राविण्य प्राप्त केले. संचालन सूरज देशकर यांनी केले. तर आभार अमीत खोब्रागडे यांनी मानले.

महाविद्यालयात सद्भावना पंधरवाडा आयोजन.

प्रा. अशोक कष्टी मार्गदर्शन करतांना.

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
ग्रामगीता महाविद्यालय

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur




रासेयो शिबिरात स्वच्छता
अभियान




रासेयो स्वयंसेवक विहिर पाणवठा
स्वच्छ करतांना

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
ग्रामगी... महाविद्या...



शिबीरार्थी उसेगांव येथे पाणी व्यवस्थापन करतांना.



उसेगांव येथील शिबीरात रांगोळी स्पर्धेचे आयोजन

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
ग्रामगीता महाविद्यालय



रासेयो शिबिरात डॉ. जाने सर मार्गदर्शन करतांना

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
ग्रामगीता महाविद्या...




उसेगांव येथील शिबिरात मा. विनोद खापुर्णे (सरपंच उसेगांव) मार्गदर्शन करतांना